मा.मुख्य कार्यकारी अधिकारी ,
सातारा जिल्हा परिषद सातारा यांची
सन 2017-18 मधील तपासणी अहवाल
वाचना बाबत.

सातारा जिल्हा परिषद सातारा,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.साजिप/ साप्रवि-आस्था 2(4)/566 /2019 दिनांक 16/9/2019

**परिपत्रक**

सातारा जिल्हा परिषद कडील सामान्य प्रशासन विभागाकडून 11 तालुक्यातील विकास गटातील पंचायत समितींची सन 2017-18 या आर्थीक वर्षाची तपासणी करणेत आलेली असल्याने सदर तपासणी मधील मुद्यांवर अहवाल वाचन पंचायत समिती फलटण , कराड, खटाव येथे करणेत आले सदर अहवाल वाचनावेळी आस्थापना बाबी मध्ये कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील बांबीवर घेणेत आलेल्या शे-यांची पूर्तता 1 वर्षाचा कालावधी लोटला असून अद्याप पुर्तता केलेली नसल्याचे दिसून आले. तसेच कर्मचा-यांच्या सेवेत दाखल झालेल्या दिनांकानुसार सेवापुस्तक अद्यावत करताना आवश्यक बाबी उदा. पहिल्या पानावरील जन्मतारखेची नोंद, दर पाच वर्षांनी तपासणी करुन प्रमाणित करणे , जातपडताळणी बाबतची नोंद, भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक नोंद, निवृत्तीवेतन नामनिर्देशनाची नोंद, मृत्यू अन सेवानिवृत्ती उपदान नामनिर्देशनाची नोंद, गट विमा सदस्यत्वाची व नामनिर्देशन तसेच वेळोवेळी वर्गणी वाढीनुसारची नोंद , संगणक अर्हता, हिंदी मराठी भाषा उत्तीर्ण झाल्याची अथवा सुट मिळाल्याची नोंद, सेवा पडताळणी , अर्जित /परावर्तीत रजा नोंद व हिशोब, नोंदी वेळीच सेवापुस्तकामध्ये घेणेत येत नसल्याचे दिसून येत नाहीत. यामुळे काही कर्मचारी सेवा प्रवेश परीक्षा व संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण नसताना त्यांना नियमित वेतन वाढ दिलेल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बाबत संबधीत गटविकास अधिकारी यांनी पडताळणी करुन योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा या दिरंगाई व हलगर्जीपणा बाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (शिस्त व अपिल) अधिनियम 1964 नुसार शिस्तभंगाचे कारवाईस संबधीत अधिकारी /कर्मचारी पात्र होत आहेत. उपरोक्त तीन तालुक्यातील अहवाल वाचनामध्ये दिसून आलेल्या बाबी अन्य 8 तालुक्यातील पंचायत समिती कडील विकास गटामध्ये तसेच जिल्हास्तरावरील विविध विभागामध्ये असणेची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव सर्व गटविकास अधिकारी / खाते प्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे स्तरावर योग्य ती सेवा पुस्तकातील नोंदी बाबत पडताळणी करुन नोंदी अद्यावत कराव्यात.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग अधिसुचना क्र.डीएसबी-1085 -सीआर-221-13 दि.20.01.1986 अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा परिक्षा 1985 (नेमणूकोत्तर परीक्षा) (कनिष्ठ अर्हता परीक्षा) हे नियम 20 जानेवारी 1986 पासून अस्तीत्वात आले आहेत. सदर नियम जिल्हा परिषद सेवकांना लागु असल्याने , सामान्य प्रशासन विभाग सातारा जिल्हा परिषद कडील परिपत्रक क्र.आस्था 2 (1) 519 दिनांक 18.04.1986 अन्वये शासन अधिुसचना चे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही बाबत सविस्तर तपशिल योग्य त्या कार्यवाहीसाठी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर परिपत्रकानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकानुसार दिनांक 20.01.1986 पूर्वी जिल्हा परिषद सेवेत दाखल झालेले कर्मचारी दिनांक 20.01.1986 पासून 9 वर्षाचे काळात परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यश्क आहे. तसेच दि.20.01.1986 रोजी किंवा तदनंतर सरळसेवेने नियुक्त केलेल्या सेवकांनी 4 वर्ष काळात 3 संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी /वापरा बाबतचे ज्ञान ) शासन राजपत्र दि.3 मे 2000 अन्वये दिनांक 1.1.2001 पासून सवेतील गट अ, अ,क मधील अधिकारी /कर्मचारी यांना शासन मान्य संस्थेचे संगणक प्रमाणपत्र दोन वर्षाच्या आत सादर करणेचेनिर्देश देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही होऊन सेवापुस्तकामध्ये नोंदी प्रामुख्याने करणे गरजेचे आहे.त्याप्रमाणे शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश , शासन निर्णय, परीपत्रके, याची आपले स्तरावर पडताळणी होऊन संगणक परीक्षा बाबत योग्य ती कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.